## Dnyandeep Shikshan Prasarak Mandal, Chandrapur
# Dr. Khatri Mahavidyalaya, Tukum Chandrapur

### डॉ. नंदकिशोर खत्री यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त नंदकिशोर गौरव ग्रंथाचे प्रकाशन

स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे दिनांक ०८ मार्च २०२६ रोजी शिक्षण व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे आदरणीय डॉ. नंदकिशोर हरिलालजी खत्री यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या प्रदीर्घ कार्याचा गौरव करण्यासाठी प्रकाशित करण्यात आलेल्या "नंदकिशोर" या गौरव ग्रंथाचा प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून मा. डॉ. सुधीरभाऊ मुनगंटीवार, (माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आमदार बल्लारपूर विधानसभा क्षेत्र), मा. किशोरभाऊ जोरगेवार (आमदार चंद्रपूर विधानसभा क्षेत्र), सत्कारमूर्ती डॉ. नंदकिशोर हरिलालजी खत्री, मा. आमदार सुधाकर अडबाले, (विधान परिषद सदस्य), मा. ॲड. वामनराव चटप, (माजी आमदार राजुरा विधानसभा क्षेत्र), मा. डॉ. अशोकभाऊ जिवतोडे, (सचिव, चांदा शिक्षण प्रसारक मंडळ) सोबतच मा. डॉ. सुशिल कपूर, मा. प्रा. अनुश्री पाराशर, मा. अभिलेषजी खत्री, मा. अविनाशजी आकुलवार, मा. श्रीमती उर्मिला कपूर, मा. डॉ. अनिल शिंदे, मा. डॉ. प्रदीप घोरपडे, मा. सूर्यकांतजी खनके, मा. प्रेमिलाताई आकुलवार आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते "नंदकिशोर" या गौरव ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. बबनराव तायवाडे यांनी डॉ. नंदकिशोर खत्री यांच्या शिक्षण, सामाजीक बांधीलकी आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या समर्पित कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. प्रमुख अतिथी डॉ. सुधीर भाऊ मुनगंटीवार म्हणाले की, ज्ञान, संस्कार आणि विद्यार्थ्यांप्रती अपार आपुलकी यांचा सुंदर संगम असलेले खत्री सर केवळ प्राध्यापक नाहीत तर अनेक पिढ्यांचे मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या सोनेरी कर्तुत्वाचा हा गौरवग्रंथ म्हणजे त्यांच्या तेजस्वी कार्याचा जिवंत दस्तऐवज आहे. माननीय आमदार किशोरजी जोरगेवार म्हणाले की, डॉ. नंदकिशोरजी खत्री यांनी शिक्षण, समाजकार्य आणि जनसेवा या क्षेत्रात केलेले योगदान अत्यंत मोलाचे असून त्यांच्या कार्यातून अनेक पिढ्यांना प्रेरणा मिळत आहे. समाजाच्या प्रगतीसाठी असलेली त्यांची तळमळ, समर्पन आणि दुरदृष्टी ही खरोखरच लाख मोलाची आहे. माननीय आमदार सुधाकर अडबाले आपल्या मनोगतात म्हणाले की, डॉ. खत्री सरांनी शिक्षण क्षेत्रात निष्ठा, प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधीलकी जपत उल्लेखनीय कार्य केले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले असुन त्यांच्या नेतृत्वामुळे संस्थेची प्रगती होत आहे. माजी आमदार ॲड. वामनराव चटप यांनी आपल्या भाषणात डॉ. खत्री सरांच्या सामाजीक बांधीलकीचे कौतुक करत त्यांनी समाजहितासाठी सातत्याने केलेले कार्य उल्लेखणीय असल्याचे सांगीतले. डॉ. अशोकभाऊ जिवतोडे यांनीही आपल्या मनोगतात डॉ. खत्री सर यांच्या कार्याचा गौरव करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात बऱ्याच मान्यवरांनी डॉ. नंदकिशोर खत्री यांच्या व्यक्तिमत्वाचा आणि कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास विविध संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, कुटूंबातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वांचे सहकार्य लाभले हे विशेष.


ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित


ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित




ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित


ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित